प्राचार्य डॉ. आत्मारामजी टेंगसे अमृत महोत्सव गौरव ग्रंथ

# दीपस्तंभ



मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. वसंत सातपुते

कार्यकारी संपादक

प्राचार्य डॉ. दीनानाथ फुलवाडकर

ISBN: 978-81-19718-96-2

दीपस्तंभ : प्राचार्य डॉ. आत्मारामजी टेंगसे अमृत महोत्सव गौरव ग्रंथ

**संपादक :** प्राचार्य डॉ. वसंत सातपुते

**प्रथम आवृत्ती:** १६ जून २०२४

© **प्राचार्य डॉ. वसंत सातपुते**
मो. ९४२३७७९०००

**प्रकाशक:**

डॉ.कल्याण गांगर्डे
न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी
मो. ८३२९०००७३२

**मुद्रक:**

स्नेहल प्रिंटर्स, परभणी

मो. ९७३०७२१३९३

**टाइपसेटिंग :** डॉ.कल्याण गांगर्डे

**मुखपृष्ठ:** डॉ.कल्याण गांगर्डे

**किंमत:** ₹ २९९/-

या पुस्तकातील मजकुराशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सदर पुस्तकाच्या आतील मजकूर कॉपी करणे अथवा इतरत्र वापरणे हा कायदेशीर गुन्हा आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

15. समाजशील प्रशासक: प्राचार्य डॉ.आत्मारामजी टेंगसे सर
*प्रा. डॉ. तुकाराम बोबडे* ........................................ 90

16. आमचे प्राचार्य
*डॉ.सारिका बुरगे- गुंडरे*........................................ 94

17. माझ्या आठवणीतील प्राचार्य आत्माराम टेंगसे सर
*डॉ. हमीदुल्ला खान हफीजुल्ला खान*........................................ 97

18. मी पाहिलेले प्राचार्य डॉ.आत्मारामजी टेंगसे सर
*प्रा. डॉ. अविनाश कोंडीबा खोकले*........................................ 103

19. मागे वळून पाहताना ...
*डॉ.बी आर मस्के*........................................ 113

20. मी पाहिलेला समाजसुधारक: आत्माराम टेंगसे
*डॉ.अतुल चंद्रमोरे*........................................ 117

21. माझ्या जीवनातील आदर्श व्यक्ती प्राचार्य आत्माराम टेंगसे सर
*प्रा. चव्हाण सुखदेव*........................................ 119

22. भला माणूस- प्राचार्य डॉ.आत्मारामजी टेंगसे सर
*प्रा. डॉ. कालिदास गुडदे*........................................ 121

23. मला भावलेले प्राचार्य टेंगसे सर
*प्रा. गोरखनाथ धाकपाडे*........................................ 125

24. शिस्तप्रिय शिक्षक !
*प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये*........................................ 128

25. "स्थितप्रज्ञ", किमयागार प्राचार्य डॉ. आत्मारामजी टेंगसे सर
*प्रा. डॉ. हरिभाऊ पांडुरंगराव कदम*........................................ 136

26. प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे : निगर्वी आणि संवेदनशील व्यक्तिमत्व
*प्रा.डॉ. नारायण कांबळे*........................................ 140

27. प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे : एक आदर्श व्यक्तिमत्व
*प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे*........................................ 147

28. अष्टपैलू रत्न व प्रेरणास्थान प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे
*प्रा. बी.एच. महाजन*........................................ 150

29. कुशल प्रशासक डॉ. आत्माराम टेंगसे
*डॉ. भास्कर माने*........................................ 152

30. प्राचार्य आत्मारामजी टेंगसे सर: समन्वयी प्रशासक
*प्रा.डॉ नानासाहेब पाटील*........................................ 156

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे : एक आदर्श व्यक्तिमत्व

**प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे**
वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी
मो. ९४२००३५७११

प्राचार्य आत्माराम टेंगसे यांचा अमृत महोत्सव सोहळा गंगाखेड येथे होणार असल्यामुळे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी त्यांच्यासोबत आलेले अनुभव कथन करत आहे .पाथरी तालुक्यात रेणापूर या छोट्याशा गावात शेतकरी कुटुंबात जन्मलेले टेंगसे यांनी एम ए समाजशास्त्र विषयात केल्यानंतर गंगाखेड सारख्या बालाघाटच्या डोंगर रांगांमध्ये बसलेल्या शहरांमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून आपल्या कार्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगी असलेली जिद्द, मेहनत, दूरदृष्टी यामुळे त्यांनी सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून आपल्या कामास सुरुवात केली आणि त्यातच संस्थेने त्यांना प्राचार्य पदाची जबाबदारी दिली. अखंडपणे त्यांची सेवा सुरू होती. 1993-94 पर्यंत गंगाखेड तालुक्यात फक्त गंगाखेड येथे महाविद्यालय होते. त्यावेळी पालम आणि सोनपेठ येथे महाविद्यालय नव्हते. गोदावरी नदीच्या अलीकडे फक्त गंगाखेड येथील संत जनाबाई महाविद्यालय अस्तित्वात होते. सरांच्या दूरदृष्टीमुळे 1991 ला बारावीच्या परीक्षेत काही विद्यार्थी मेरिट लिस्ट मध्ये आले. शिक्षणाचा प्रसार दिवसेंदिवस वाढत गेला. तालुक्यांची संख्या वाढत गेली. आणि त्यावेळेस पालम तालुका झाला आणि वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. 1994 पर्यंत सोनपेठ परिसरात एकही महाविद्यालय नसल्यामुळे येथील विद्यार्थ्यांना परळी, अंबाजोगाई, परभणी, सेलू येथे उच्चशिक्षणासाठी जावे लागत होते. सोनपेठ येथे ' क ' वर्गाची नगरपालिका असूनही गावात एकही वरिष्ठ महाविद्यालय नसल्यामुळे कै. राजाभाऊ कदम यांनी महाविद्यालय सुरू केले.

महाविद्यालय सुरू झाल्यानंतर दूरदृष्टीने चालवत असलेले प्राचार्य टेंगसे सर यांचे मार्गदर्शन नवीन महाविद्यालय स्थापन होत असल्यामुळे घ्यावी लागत असे. 1996 ला माझ्याकडे सोनपेठच्या वरपूडकर महाविद्यालयाचा प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार मिळाला. नवीनच महाविद्यालय असल्यामुळे आणि दूरदृष्टीचे प्राचार्य गंगाखेड येथे कार्यरत असल्यामुळे आम्ही माहिती घेण्यासाठी सरांकडे जायचं. सरांनी सर्व नेमणूक आदेशापासून ते लागणारी कागदपत्र दिली. प्रवेश फॉर्म छापणे, पात्रता फॉर्म भरणे, शिष्यवृत्ती, जाहिरात कशी द्यायची अशी इत्यादी प्रकारचे सर्व नमुने हे सरांनी आम्हाला दिले. बऱ्याच चर्चासत्राला सरांसोबत जाण्याचा योग आला.

औरंगाबादच्या महिला महाविद्यालयात प्राचार्य संघटनेचे अधिवेशन होते. या अधिवेशनाला महाराष्ट्रातील महाविद्यालयाचे प्राचार्य आले होते. कामानिमित्त मी औरंगाबादला गेलो आणि तिथे प्राचार्य संघटनेच्या अधिवेशनात नाव नोंदणी केली. दोन दिवसाचे हे अधिवेशन करण्यासाठी त्यांच्या सोबतच राहिलो. सर्वांना राहण्यासाठी व्यवस्था केली होती. परभणी जिल्ह्यातील प्राचार्य निवास व्यवस्था जिथे केली होती तेथे मीही गेलो. त्या रूममध्ये प्राचार्य टेंगसे सर, पालम येथील महाविद्यालयाचे प्राचार्य टाले सर, मानवत येथील के.के.एम.महाविद्यालयाचे प्राचार्य शिंदे सर आणि मी होतो. संध्याकाळी चर्चासत्र संपल्यानंतर विविध विषयावर चर्चा सुरू झाल्या. शिंदे सरांनी टेंगसे सरांना विचारले, मुलीचे लग्न झाले का? त्यावेळेस टेंगसे सरांनी स्थळ पाहणे सुरू आहे अशी चर्चा केली. शिंदे सरांनी मला म्हटले आपल्याकडे नवीन महाविद्यालय निघाले असून आपल्याकडे कोण कोण प्राध्यापक आहेत. मग मी त्यांना दोघा तिघांची नावे सांगितली. त्यामध्ये सरांनी इसाद येथील इंग्रजी विषयाला असलेले प्राध्यापक वसंत सातपुते यांच्याशी प्रस्ताव टाकला आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या एम.ए. समाजशास्त्र विषयात गोल्ड मेडल मिळालेल्या सुनीता यांचे लग्न वसंत सातपुते यांच्याशी झाले. एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून टेंगसे सरांकडं पाहिल्या जाते. पुढे ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये संचालक झाले. सेवानिवृत्त झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या नांदेड केंद्रात संचालक झाले. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर व समित्यावर अनेक वर्ष त्यांनी काम केले. समाजशास्त्र विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळवली. सर्वांसोबत

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

त्यांनी उत्तम काम केले आहे. त्यामुळे आगळ वेगळं व्यक्तिमत्व असलेले प्राचार्य टेंगसे सर सर्वांच्या लक्षात राहतात.

एका लहानशा खेड्यात शेतकऱ्याच्या पोटी जन्मलेला एक शेतकऱ्याचा मुलगा प्राध्यापक होतो. पुढे प्राचार्य, त्या नंतर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक म्हणून, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक उपकेंद्र नांदेड चे संचालक आणि कदाचित पहिलेच असतील ज्या संस्थेत प्रामाणिकपणे नोकरी केली त्याच संत जनाबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून सध्या कार्यरत आहेत. ही आमच्या साठी खरोखरच आनंदाची गोष्ट आहे.

त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे आपल्या सेवेचा कार्यभार पूर्ण केला . त्यांचा मोठा शैक्षणिक क्षेत्रात परिवार आहे. कोणत्याही अडचणीवर चांगला सल्ला देण्याचे काम सर नेहमी करीत असतात .आज त्यांचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. त्यांना माझ्याकडून लाख लाख शुभेच्छा ! पुढील आयुष्य निरोगी जाओ एवढीच अपेक्षा.

❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani